# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प)

## नागपूर रेल्वे मेट्रो स्टेशनच्या प्रवासी संख्येमध्ये ५०% वाढ
## मेट्रो-रेल्वे-मेट्रो नागरिकांचा प्रवास
## रेल्वे मधून उतरताच मेट्रो उपलब्ध



नागपूर : सार्वजनिक वाहतुकीत नागरिकांच्या पसंतीस उतरलेली वाहतूक सेवा म्हणजे नागपूर मेट्रो रेल सेवा. मेट्रो हे वाहतुकीचे सर्वोत्तम, सुलभ, सुविधाजनक, किफायतशीर आणि सुरक्षित

साधन आहे. नोकरीपेशा लोकांसाठी, व्यावसायिकांसाठी आणि विशेषतः विद्यार्थ्यांसाठी मेट्रो अत्यंत उपयुक्त ठरत आहे.यामध्ये आणखी भर घालत नागपूर रेल्वे मेट्रो स्टेशनला प्रवाश्यांची मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. मागील वर्षीच्या प्रवासी संख्येच्या तुलनेत यावर्षी यामध्ये ५०% वाढ झाली आहे. उदा. मागील वर्षी नागपूर रेल्वे स्टेशन येथून प्रवासी संख्या ही २५०० प्रतिदिवस जे कि आता ३५०० प्रतिदिवस होत असल्याचे निदर्शनास आले आहेत.

सिताबर्डी इंटरचेंज, लोकमान्य नगर मेट्रो स्टेशन नंतर नागपूर रेल्वे मेट्रो स्टेशनला नागरिक मोठ्या प्रमाणात प्राधान्य देत आहे. नागरिक बाहेरगावी जाण्याकरता रेल्वेने प्रवास करत असतात शहरातील इतर भागातून प्रवासी रेल्वे स्टेशन या ठिकाणी येत असून नागरिकांनी वैक्तिक आणि अन्य साधनापेक्षा मेट्रोने रेल्वे स्टेशन पर्यंत प्रवास करण्यास पसंती दिली आहे. महा मेट्रोच्या वतीने मेट्रो ट्रेनच्या आत ऑडिओद्वारे नागरिकांना रेल्वे स्टेशन पर्यंत कश्या प्रकारे प्रवास करता येईल या संदर्भात सुचना दिल्या जातात.

मुख्य म्हणजे भारतीय रेल्वेने प्रवास करणाऱ्या प्रवाश्याना नागपूर रेल्वे स्टेशन येथे उतरताच मेट्रो ट्रेनने प्रवास करता येणे सहज झाले आहे.महा मेट्रोने नागपूर रेल्वे स्टेशनच्या फ्लॅटफॉर्म क्रमांक ८ येथून म्हणजेच संत्रा मार्केटच्या बाजूने मेट्रो स्टेशनला जोडले आहे.ज्यामुळे नागरिकांना सहज पणे मेट्रो स्टेशन परिसरात पोहचुन मेट्रोचा उपयोग करून पुढील यात्रा करणे शक्य होत आहे. मुख्य म्हणजे नागपूर रेल्वे स्टेशन येथून देशाच्या चारही बाजूने जाणाऱ्या रेल्वे गाड्या या मेट्रो स्थानकावरून जात असतात ज्याला डायमंड क्रॉसिंग म्हणून देखील ओळखल्या जाते. मोठ्या प्रमाणात नागरिक देशाच्या अन्य ठिकाणी जाण्याकरता या ठिकाणाहून प्रवास करीत असतात त्यामुळे रेल्वे प्रवाश्याना निश्चितच याचा फायदा होत आहे. या व्यतिरिक्त मेट्रो स्टेशन जवळ असलेले संत्रा मार्केट,मॉल,शाळा,रेल्वे रनिंग रूम,रेल्वे कॉलोनी तसेच अनेक जुन्या वस्तीतिल नागरिकांनकरिता देखील उपयुक्त आहे .स्टेशन लगतच्या परिसरात अनेक प्रतिष्ठित शासकीय व निमशासकीय कार्यालय, मंदिर, हॉल असल्यामुळे या परिसरात नागरिकांची नेहमीच रहदारी असते सदर मेट्रो स्टेशन मुळे प्रवाश्याना तसेच स्थानिक नागरिकांना याचा नक्कीच फायदा होत आहे.

या पूर्वी देखील महा मेट्रोने ऑरेंज लाईन मार्गिकेवरील अजनी रेल्वे स्टेशन काँग्रेस नगर मेट्रो स्टेशनशी संलग्न करण्यात आले आहे त्या ठिकाणी देखील महा मेट्रोने अजनी रेल्वे स्टेशनच्या पहिल्या फ्लॅटफॉर्म येथून मेट्रो स्टेशनला जोडले आहे. ज्यामुळे अनेक नागरिकांना सहज पणे मेट्रो

स्टेशन परिसरात पोहचऱ्यास मदत मिळत असून नागरिक मोठ्या प्रमाणात याचा फायदा होत आहे.

• **नागपूर रेल्वे स्टेशन येथून मेट्रो प्लॅटफार्म पर्यंत पोहोचण्याकरीता लिफ्ट/एस्केलेटर्सचा उपयोग:** मेट्रोस्टेशनच्या दोन्ही (उत्तर व दक्षिण) बाजूने आगमन/निर्गमनची व्यवस्था आहे. ग्राउंड लेव्हल, कॉनकोर्स लेव्हल आणि प्लॅटफॉर्म अश्या तीन मजलीच्या दुसऱ्या म्हणजेच कॉनकोर्स लेव्हलवर तिकीट काउंटर व स्टेशन कंट्रोल तसेच विकलांगा करिता व्हील चेयरची देखील व्यवस्था करण्यात आली आहे.